Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फो.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.म./परीक्षा-८/२५८९
पुणे - ४११००४
दिनांक - २० जून, २०२३

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२३ विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र. ९३ अन्वये जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि. १८/०६/२०२३ रोजी समाप्त झालेली आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारित मुदत संपल्यानंतर अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारून आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशिलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

परीक्षा	अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. ५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. १००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. २००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा	सोमवार दिनांक २६/०६/२०२३ ते रविवार दिनांक ०२/०७/२०२३	सोमवार दिनांक ०३/०७/२०२३ ते रविवार दिनांक ०९/०७/२०२३	सोमवार दिनांक १०/०७/२०२३ ते सोमवार दिनांक १७/०७/२०२३

सदर आवेदनपत्र कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची Print Out व आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क घेण्यात यावे. सदर शुल्क मंडळाकडे प्राप्त झाल्यानंतरच अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.

* विभागीय मंडळाच्या परीक्षा शाखेने प्राप्त शुल्क व ऑनलाईन आलेली आवेदनपत्रे यांची तपासणी करणे आवश्यक आहे.

(पुढील पानावर)

म. रा. मा. व उच्च मा. शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११ ००५
22 JUN 2023
आवक क्रमांक:- 11849

Scanned with OKEN Scanner

प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबधित उच्च माध्यमिक शाळा प्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विहीत तक्तामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट ब) मा. विभागीय अध्यक्ष यांची शिफारशी व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. **मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरी शिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.** मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतही सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात यावे.

उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला माहितीचा तक्ता (परिशिष्ट अ) राज्यमंडळाकडे पाठविण्यात येऊ नये. तसेच इतर कागदपत्रेही राज्यमंडळाकडे पाठवू नयेत. (उदा. विद्यार्थ्यांचा अर्ज, वैद्यकिय दाखला इ.) याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा.

राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी दिनांक १७ /०७/२०२३ पर्यंत घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदन पत्रांचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत. **कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ४.

सोबत - परिशिष्ट 'अ', 'ब' व शुल्क आकारावयाचा तक्ता

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
३. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे ४.
४. लेखा शाखा, राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.पु.वि.मं./शाखा-अ/3161
पुणे-४११००५
दि 22/०६/२०२३

प्रति,
प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय
जिल्हा-पुणे /अहमदनगर /सोलापूर,

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या सूचना फलकावर लावून विद्यार्थी व पालकांच्या निदर्शनास आणून द्यावी

(अनुराधा ओक)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,पुणे-०५

Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट-अ

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नाव: ----------

विभागीय मंडळाचे नाव: ---------- विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांक: ----------

विद्यार्थ्यांची मुदतबाह्य आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

इ. १२ वी

१) विद्यार्थ्याचे नाव : ----------

२) क. म. वि. नाव व पत्ता : ----------

३) क. म. वि. सांकेतिक क्रमांक : ----------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार

ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती

ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार

ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती

ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

६) कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची शिफारस :-

प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का

अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला - रोख/चलन क्रमांक ----------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ----------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ९३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्याचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का

Scanned with OKEN Scanner

फक्त कार्यालयीन वापराकरीता

पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ विद्यार्थी यांचेकरीता(१२ वी)

अतिविलंब शुल्क			विशेष अतिविलंब शुल्क			अतिविशेष अतिविलंब शुल्क		
प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.५०/-			प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.१००/-			प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.२००/-		
अ.क्र.	दिनांक	रक्कम	अ.क्र.	दिनांक	रक्कम	अ.क्र.	दिनांक	रक्कम
१	२६.०६.२०२३	५०/-	८	०३.०७.२०२३	४५०/-	१५	१०.०७.२०२३	१२५०/-
२	२७.०६.२०२३	१००/-	९	०४.०७.२०२३	५५०/-	१६	११.०७.२०२३	१४५०/-
३	२८.०६.२०२३	१५०/-	१०	०५.०७.२०२३	६५०/-	१७	१२.०७.२०२३	१६५०/-
४	२९.०६.२०२३	२००/-	११	०६.०७.२०२३	७५०/-	१८	१३.०७.२०२३	१८५०/-
५	३०.०६.२०२३	२५०/-	१२	०७.०७.२०२३	८५०/-	१९	१४.०७.२०२३	२०५०/-
६	०१.०७.२०२३	३००/-	१३	०८.०७.२०२३	९५०/-	२०	१५.०७.२०२३	२२५०/-
७	०२.०७.२०२३	३५०/-	१४	०९.०७.२०२३	१०५०/-	२१	१६.०७.२०२३	२४५०/-
						२२	१७.०७.२०२३	२६५०/-

परिशिष्ट – ब

जुलै–ऑगस्ट २०२३ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा

अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह प्राप्त झालेल्या आवेदनपत्राची संकलित केलेली माहिती

विभागीय मंडळाचे नाव : ---------- विभागीय मंडळ जिल्हयाचे नाव : ----------

(संपूर्ण रकाने परिपूर्ण भरावेत)

सलग क्रमांक	अ. क्र.	विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव	क.म.वि. सांकेतिक क्रमांक	विभागीय मंडळात अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक	अति विलंबाचे एकूण दिवस	अति विलंबाचे कारण	दंडाची रक्कम रुपये (फक्त दंडाची)	विद्यार्थी नियमित / पुनर्परीक्षार्थी	प्राचार्य शिफारस होय / नाही	विभागीय अध्यक्षांची शिफारस होय / नाही	शेरा

विभागीय सचिव

_____ विभागीय मंडळ

Scanned with OKEN Scanner